# रायगड जिल्हा परिषद,अलिबाग
# आरोग्य विभाग

दूरध्वनी क्रमांक – 02141-222077 ई मेल – dhozpraigad@gmail.com

**जावक क्रमांक - राजिप/आरोग्य/** आस्था 2 / **/2025** **दिनांक - /09/2025**

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांचे अधिपत्याखालील एमबीबीएस/ बीएएमएस तसेच वैदयकिय अधिकारी मानधन तत्वावर भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे.

## जाहिरात.

- आदिवासी व दुर्गम क्षेत्रात काम करणा-या एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.८०,०००/- व इतर क्षेत्रात काम करणा-या एमबीबीएस वैदयकिय अधिका-यांना रु.७५,०००/- इतके एकत्रित मानधन
- प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदावर एमबीबीएस पात्रता धारण केलेले वैदयकिय अधिकारी प्रयत्न करुनही उपलब्ध न झाल्यास त्या ठिकाणी बीएएमएस अहर्ताधारक उमेदवरांना नियुक्ती देण्यांत येईल. सदर पदावर एमबीबीएस अहर्ताधारक उमेदवार नियुक्त झाल्यास बीएएमएस अहर्ताधारक उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल बीएएमएस अहर्ताधारक वैदयकिय अधिका-यांना आदिवासी व दुर्गम भागात काम करणा-या वैदयकिय अधिका-यांना रु. ४५०००/- व इतर क्षेत्रात रु. ४0000/- इतके एकत्रित मानधन
- मुलाखतीच्या दिनांकास रिक्त असलेली पदे समुपदेशनासाठी दर्शनिय भागावर दर्शविण्यात येतील.
- वैदयकिय अधिका-यांची नेमणूक ११ महिन्यासाठी राहील. तसेच कंत्राटी वैदयकिय अधिकारी हे नियमित कर्मचा-याप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.
- खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा कमाल ३८ वर्षे व आरक्षित प्रवर्गासाठी ४३ वर्षे पर्यंत राहील.
- वैद्यकिय अधिकारी यांनी महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, एमबीबीएस/बीएएमएस गुणपत्रिका (सर्व वर्षाच्या ) पदवी / पदविका गुणपत्रिका व प्रमाणपत्र, आंतरवासीता प्रमाणपत्र, जात व जात वैधता प्रमाणपत्र शाळा सोडल्याचा दाखला वयाचा पुरावा, आधार कार्ड ई. मुळ कागदपत्र व त्यांच्या छायांकित प्रतीचा एक संच व पासपोर्ट साईज फोटोसह उपस्थीत रहावे
- नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीने सर्वात कनिष्ठ वैद्यकिय अधि-यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.
- शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्याअनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन एनपीएम, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत. वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्याने सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगता येणार नाही . अथवा त्यासाठी न्यायालयात दाद मागता येणार नाही. अशा आशयाचे बंधपत्र रु. १०० स्टॅपपेपरवर घेण्यात येईल.
- पुर्ननियुक्ती देण्यांत येणा-या वैद्यकिय अधिका-यांना एक दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देण्यात येईल.
- सदर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांना म.ना.से (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदी लागू राहतील.
- सदर कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची अगावू नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.
- ५८ वर्षे पूर्ण करुन सेवा निवृत्त झालेले वैद्यकिय अधिकारी, शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी, अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतुन काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी, कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.
- जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेपासून येणा-या १५ तारखेला व ३० तारखेला मुलाखती ठेवण्यांत येत आहेत. सदर तारखेला सुट्टी असल्यास दुस-या दिवशी ही प्रक्रिया राबविण्यांत येईल. संबंधित वैदयकिय अधिका-यांनी १५ तारखेच्या मुलाखतीसाठी दिनांक १ ते १४ तारखेपर्यंत व ३० तारखेच्या मुलाखतीसाठी दिनांक १६ ते २९ तारखे दरम्यान कार्यालयीन वेळेत जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग येथे अर्ज करावेत. अर्जाचा विहीत नमुना कार्यालयात उपलब्ध करुन दिला जाईल. मुलाखत मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयात घेण्यांत येतील.
- उक्त दर्शविण्यांत आलेल्या अटी मध्ये बदल करण्याचे प्राधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखून ठेवलेले आहेत.

सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग